अतारांकित प्रश्नोत्तरांची १०३ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

लोहा (ता.जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा दर्जा वाढविण्याबाबत

(१) २९९९ (०८-०४-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (ता. जि. नांदेड) येथील जि.प. माध्यमिक शाळा ही सध्या शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधां अभावी बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शाळांची शैक्षणिक गुणवत्ता दिवसेदिंवस वाढत असतांना नांदेड शहरातील जि.प. माध्यमिक शाळेची गुणवत्ता ढासळत असुन यास संबंधित शाळेतील प्रशासन व शिक्षक जबाबदार असल्याची खंत पालकांनी व्यक्त केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जि.प. शाळेचा दर्जा वाढविण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शाळेचा मागील १० वर्षातील इयत्ता १० वी चा निकाल व शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख चढता आहे. तसेच शैक्षणिक गुणवत्ता उत्तम रहावी यासाठी इयत्ता ५ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा व सराव परिक्षांचे व अप्रगत मुलांसाठी जादा सराव वर्गाचे आयोजन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सावरगांव (ता.निफाड जि.नाशिक) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वाढीव वर्ग खोल्यांच्या बांधकामाबाबत

(२) ११४२९ (१५-०८-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगांव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारतीची

दुरवस्था झाल्याने नवीन इमारत बांधकाम करण्यास सन २०१०-११ मध्ये रु. ३० लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देऊन सन २०१६ मध्ये या इमारतीचे निर्लेखन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-१९ या वर्षापासून प्रति खोलीस बांधकामाचा खर्च रु.८ लक्ष करण्यात आला असल्यामुळे रु.३० लक्ष ऐवजी रु.४८ लक्ष रुपयांची मागणी शालेय व्यव्यस्थापन समिती तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार वाढीव निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) : (१) होय.
(२) व (३) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावरगाव येथील बांधकाम जागेअभावी वेळेत सुरु न झाल्याने सदर बांधकामाची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर शाळेच्या बांधकामासाठी २ हेक्टर जागा जिल्हा परिषदेच्या नावे करण्यात आली आहे. सदर शाळेस ७ वर्गखोल्यांची आवश्यकता असून त्यापैकी जिल्हा नियोजन समितीकडून दोन वर्गखोल्यांसाठी रु.१९.२० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच सीएसआर निधीतून वर्गखोली बांधकाम मंजूर होण्याकरीता हिंदुस्थान एरॉनॉटीक्स लिमिटेड (H.A.L.), ओझर यांचेकडे मागणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

(३) १८५१७ (२७-११-२०२०). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत सुमारे ३००० शिक्षक समायोजनेच्या प्रतिक्षेत असून सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गातील २२ हजारांहून अधिक शिक्षक अतिरिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने २० पेक्षा कमी पट असलेल्या शाळा बंद केल्यास बंद केलेल्या शाळांमधील शिक्षकांचे समायोजन केल्यास पुन्हा अतिरिक्त शिक्षकांची संख्या वाढणार असल्याने शिक्षकांच्या समायोजनाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे तातडीने समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे का,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

प्रा. वर्षा गायकवाड (०३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही, राज्यात सन २०१९-२० च्या संचमान्यतेनुसार प्राथमिक विभागामध्ये एकुण ५२९ अतिरिक्त शिक्षक आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन शासन निर्णय दिनांक ४.१०.२०१७ नुसार वेळोवेळी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळा सुरु करण्याचा घेतलेला निर्णय

(४) ३२४९२ (१२-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दिड वर्षापासून शाळा व्यवस्थापनाला शासनाकडून मिळणारे वेतनेत्तर अनुदान बंद असल्यामुळे तसेच कंपन्यांकडून आणि लोकसहभागातून मदत मिळणे बंद झाल्याने शाळा सुरु करावयाची असल्यास निर्जतूकीकरणापासून विविध सुविधा व उपाययोजना करण्यासाठी होणारा खर्च शाळा व्यवस्थापनाने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून किंवा लोकसहभागातून करावा अशी सुचना शिक्षण विभागाने शाळा संस्थांना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निर्जतूकीकरणापासून शाळांनी शिक्षण विभागाच्या सुचनेनुसार शाळेत पंखा, सॅनिटायझर, वैद्यकीय उपकरणे (ऑक्सीमिटर, इंफ्रारेड थर्मामिटर), मुखपट्या या सर्व सोयी सीएसआर निधीतून उपलब्ध करुन घेण्यास व्यवस्थापकांना “ना हरकत” किंवा स्थानिक निधीतून कराव्यात अशा सुचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
शाळा सुरू करण्यासाठी निर्जंतुकीकरण करण्यासाठी स्थानिक प्रशासनास सूचना दिल्या होत्या.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील प्रशासकीय अधिकारी,शिक्षण सहसंचालक विभागीय कार्यालय यांची चौकशी करणेबाबत

(५) ३३२०३ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.डी.पी.माने प्रशासकीय अधिकारी, शिक्षण सहसंचालक (उच्चशिक्षण) विभागीय कार्यालय,

कोल्हापूर यांच्या कामकाजासंदर्भात स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करून त्यांचेवर कारवाई करणेची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदय यांना दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२० रोजी व त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, याबाबतचा चौकशी अहवाल शासनाकडे सादर करण्याबाबत दिनांक ३१ डिसेंबर, २०२० व दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) होय.

(२) व (३) शासन पत्र दिनांक ३१.१२.२०२० अन्वये दिलेल्या सूचनेनुसार संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी तत्कालीन सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्यामार्फत चौकशी केली आहे.

गोरेगाव (ता.शेवगाव, जि.हिंगोली) येथील लाभधारक धान्यापासून वंचित राहिल्याबाबत

(६) ३३५७१ (१२-०१-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (ता.शेवगाव, जि.हिंगोली) येथे रेशनवरील धान्य वाटप न केल्याने लाभधारक धान्यापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमित धान्यवाटप होणे आणि वितरण व्यवस्था सुरळीत होण्याच्या द्रुष्टीकोनातून जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली कार्यालयामार्फत कायमस्वरूपी रास्त भाव दुकान मंजुरीसाठी जाहीर प्रगटन काढून बचत गट, संस्था इत्यादींकडून प्रस्ताव मागवण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्ताव प्राप्त होऊन नियमित धान्य वाटप कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०६-०६-२०२२) : (१) अंशत: हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणात जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्याकडून रास्तभाव दुकान मंजूरीसाठी जाहीर प्रगटन काढण्यात आले यामध्ये प्रामुख्याने बचत गट व इतर संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला असून, या जाहिर प्रगटनाची प्रक्रिया दि.२०.०१.२०२२ रोजी पार पाडण्यात आली आहे.

जाहिर प्रगटनाच्या प्रक्रियेद्वारे महिला बचत गटास रास्त भाव दुकान देण्यात आले असून माहे फेब्रुवारी, २०२२ चे धान्य नियतन शासन खाती चलन भरून घेतल्यावरच देण्याबाबत तहसिलदार, सेनगांव यांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकिय शाळा " आदर्श शाळा " म्हणून विकसित करण्याच्या निर्णयाबाबत

(७) ३३८२७ (१२-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४८८ शासकिय शाळा या आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी एकूण किती आर्थिक तरतुद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) : (१) या विभागाच्या दि.५ मार्च, २०२१ रोजी ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) सन २०२१-२२ मध्ये रू. ५३.९७ कोटी इतकी तरतुद लहान बांधकामासाठी वितरीत करण्यात आली आहे. सन २०२२-२३ या वितीय वर्षात लहान बांधकामांसाठी रू.५०.०० कोटी व मोठ्या बांधकामांसाठी २५०.०० कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

मुंबईतील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत

(८) ३३८४९ (१२-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत करोनाचे संकट पूर्णत: निवळले नसल्याने अजूनही पालक भितीपोटी विद्यार्थ्यांना शाळांत पाठवत नसल्याचे दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती केवळ २९ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शाळांमध्ये विदयार्थ्यांची १००टक्के उपस्थित होण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांचेकडून मुख्याध्यापकांच्या ऑनलाईन सभा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत पालकांशी संवाद साधण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच कोरोनाचा प्रादुर्भाव विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी आरोग्य विभागाकडून १५ ते १८ वयोगटातील मुलांना लसीकरण सुरू करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भूम,परंडा, वाशी तालूक्याच्या (जि. धाराशिव) जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीची दुरुस्ती करण्यांबाबत

(९) ३४२०७ (१२-०१-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूम, परांडा, वाशी (जि. धाराशिव) तालूक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था झालेली असून मागील वर्षात दुरुस्ती झालेली नसल्यामुळे बालभारतीकडे २१ कोटी रुपयांचा प्रस्ताव जि.प.ने सन २०२० च्या दरम्यान सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन दिलेले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) व (४) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना शिक्षण हक्क कायद्यानुसार (RTE) आवश्यक असलेल्या मुलभूत सोई-सुविधा भारत सरकारकडून समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत मंजूर करण्यात येतात. तसेच जिल्हा परिषदांकडून शाळांना भौतिक सुविधांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून उपलब्ध केल्या जातात.

राज्यातील सहायक प्राध्यापकांच्या रिक्त जागांबाबत

(१०) ३४२९७ (१२-०१-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनामार्फत एकुण १० वर्षे अशासकीय, अनुदानित महाविद्यालयामध्ये व विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापकांच्या जागा नियमितपणे न भरल्यामुळे सुमारे १२ ते १८ हजार सहायक प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास ३८५० सहायक प्राध्यापकांच्या जागा भरण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यापैकी केवळ ७०० पदे भरण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे व नागपूर येथे दिनांक १९ जुलै, २०२१ रोजीपासून नेट-सेट, पीचडी उत्तीर्ण प्राध्यापकांनी १०० टक्के प्राध्यापक भरतीरकीता बेमुदत आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०३-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
दिनांक १/१०/२०१७ च्या विद्यार्थीसंख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत.

तसेच माहे मार्च २०२०-२१ अखेर १२ व ३ अभिमत विद्यापीठे अशा एकदरीत १५ विद्यापीठांमध्ये एकूण २६०० शिक्षकीय पदे मंजूर असून १३२९ पदे भरलेली आहेत व १२७१ पदे रिक्त आहेत
(२) हे खरे नाही.
राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांची ४० टक्के म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दि. ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून पदभरतीची प्रक्रीया सुरू होती. परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर पदभरतीवर निर्बंध जारी करण्यात आल्याने पदभरतीची प्रक्रिया खंडीत झाली होती. त्यावेळी सहायक प्राध्यापकांच्या ३५८० पदांपैकी २०८८ पदे भरणे बाकी होते. मात्र शासनाच्या दि. १२/११/२०२१ च्या आदेशानुसार आता सदरची पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने आढावा घेऊन त्याअनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी श्री. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संबधित लोकप्रतिनिधी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीचे गठन करण्यात आलेले आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शिक्षण संस्थांना स्वायत्ता: विद्‌यार्थ्यांसाठी मोफत ई.लर्निंगची सुविधा शिक्षणासबंधीच्या योजना तयार करणेबाबत

(११) ३४६२७ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण संस्थांना स्वायत्ता: विद्‌यार्थ्यांना मोफत ई.लर्निंगची सुविधा

शिक्षणासबंधीच्या योजना तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी यासाठी वित्तमंत्र्यासह संबंधित खात्यांच्या विशेषाधिकार समिती नेमावी अशा महत्वपूर्ण शिफारशी प्रख्यात वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षते खालील टास्क फोर्सने शासनाला केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात अभ्यास करुन शासनाला सदर समितीने अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०६-०६-२०२२) : (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० संदर्भात अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी नेमलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गट समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ३० जून, २०२१ रोजी सादर केला आहे.
(३) सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याकरिता प्रस्तावित करण्यात आले असून विविध विषयांवर समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दहावीच्या परीक्षेचा निकालबाबत

(१२) ३५५६४ (१७-०१-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवार, दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास घोषित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माध्यमिक शालांत परीक्षेच्या संकेतस्थळावर भेट देणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे हे संकेतस्थळ काही कालावधीसाठी क्रॅश झाल्याने विद्यार्थ्यांना निकाल पाहता आला नाही व रात्रीपर्यंत हे संकेतस्थळ चालूच झाले नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१३-०६-२०२२) : (१) होय,हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
संकेतस्थळ काही कालावधीसाठी बंद पडल्यामुळे विद्यार्थ्यांना निकाल पाहता आला नाही. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० नंतर निकाल उपलब्ध होण्यास सुरुवात झाली.

(३) या संदर्भात दि.१७ जूलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील दादर (पुर्व), येथील पारसी वसाहतीतील जे.बी. वाचा हायस्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांना कोरोना संसर्ग झाल्याबाबत

(१३) ३५६६५ (१७-०१-२०२२). अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर (पुर्व) येथेली पारसी वसाहतीतील जे.बी.वाचा हायस्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांना कोरोना संसर्ग झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, कोणत्याही विद्यार्थ्याला कोरोना झाला असल्यास, तो वर्ग वा शाळा बंद ठेवावी असा नियम असतानाही संस्थेमार्फत अद्याप शाळा सुरू आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, शासनाने उक्त बाब १ व २ नुसार चौकशी केली आहे काय.
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना कोरोना संसर्ग झाल्याप्रकरणी शाळा सुरु ठेवणाऱ्या संस्थेविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) : (१)होय हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, शाळा सुरू झालेल्या पहिल्या दिवशी दि.७ ऑक्टोबर, २०२१ रोजी कोणत्याही विद्यार्थ्याला कोरोना झाला नव्हता. सदर दिवशी शाळेत आलेले विद्यार्थी नंतर दि.१२ ऑक्टोबर, २२०२१ रोजी शाळेत येणार होते. तत्पूर्वी दि.११ ऑक्टोबर, २०२१ रोजी एका विद्यार्थ्याच्या पालकाने मुलास कोरोना झाल्याचे कळविले. तसेच दुसऱ्या एका विद्यार्थ्याच्या पालकाने त्यांच्या पाल्यास कोरोना झाल्याचे दि.१२ ऑक्टोबर, २०२१ रोजी शाळा सुरू होण्यापूर्वी शाळेस कळविले. सदर विद्यार्थी दि.७ ऑक्टोबर, २०२१ नंतर शाळेची दिवाळी सुटी संपेपर्यंत दि.८ नोव्हेंबर, २०२१ रोजी पर्यंत शाळेत आले नव्हते. त्यामुळे त्यांच्यापासून इतरांना कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता नसल्याने शाळा बंद करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना काळात बालमजुरांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

(१४) ३५९०५ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद राहिल्याने विद्यार्थ्यांचे प्रमाण घटत असल्याचे तसेच येणाऱ्या काळात शाळाबाहय मुलांचे प्रमाण वाढणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणापासून वंचित राहिल्याने तसेच कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावल्याने बालमजुरीचा धोका वाढत असल्यामुळे या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी तज्ञाची समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना मुळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सर्व्हेक्षणात शाळाबाहय आढळलेल्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यवाही केली आहे.

शाळाबाहय विद्यार्थी शाळेत आणण्याची मोहीम सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या जलशुध्दीकरण व जल शीतकरण संयंत्र खरेदीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

(१५) ३६१७६ (१७-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात मानव विकास समितीने दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास जिल्हा व तालुका स्पेसिफिक योजनेंतर्गत ९ तालुक्यातील जि.प.च्या १८९ शाळांना जलशुध्दीकरण व जल शीतकरण संयंत्र बसविण्याकरीता २ कोटी ३४ हजार निधी वितरीत करुन यंत्र खरेदी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० एलपीएच आरओ अधिक युएफ वॉटर प्युरिफायर केशन प्लांट व टाकी अशा वस्तू खरेदी करण्याकरीता प्रत्येक शाळेला १ लक्ष ६ हजार तरतूद करुन घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचित केले असता शासनाच्या विहित पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करणे. इ-निविदा प्रक्रिया राबविण्यासोबतच उच्च दर्जाची गुणवत्ता राखण्याचे निर्देशित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षण विभागाने संयंत्राची खरेदी जीएम पोर्टलवरुन करताना नियमांचे पालन केले नसल्याचा आरोप जि.प.सदस्य यांनी केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जलशुध्दीकरण व जल शीतकरण संयंत्र बसविण्याच्या वितरीत करण्यात आलेल्या २ कोटी ३४ हजारांच्या निधीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे जि.प.सदस्य यांनी केला असून यंत्र मागविण्याच्या दिलेले कार्यरंभ आदेश रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, खरेदी करण्यात येणाऱ्या जलशुध्दीकरण यंत्र खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१७-०६-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

नेकनूर, (जि.बीड) येथे Science centre उभारण्याबाबत

(१६) ३६४९२ (१७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर, (जि. बीड) येथे अध्यापक विद्यालयाच्या नावे असलेल्या साडेपाच एकर पैकी साडेचार एकर जागा उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत वर्गखोल्या, कार्यालय तसेच कक्ष असणारी समोरील एक इमारत वापरात असून अंदाजे ही जागा एक एकर आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा शिक्षण खात्याच्या स्वत:च्या मालकीची असल्यामुळे जागेसाठी NOC (ना हरकत प्रमाणपत्र) ची आवश्यकता नसल्यामुळे सदर ठिकाणी सायन्स सेंटरची उभारणी करण्याचा प्रस्ताव, शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, बीड. यांनी शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या जागेवर Science Centre निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावास त्वरीत मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) :(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) शासनाने प्रत्येक महसूली मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये अत्याधुनिक 'राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्क' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्याबाबत

(१७) ३६८५१ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना दरवर्षी शिक्षक दिनी प्रस्ताव मागविणे, प्रस्तावांची छाननी, मुलाखती अशा प्रकारची प्रक्रिया पार पाडून चांगले कार्य करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना प्रादुर्भावामुळे शिक्षक पुरस्कार ऑनलाईनव्दारे जाहीर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) : (१) होय.
(२) (३) व (४) राज्य शिक्षक पुरस्काराचे निकष सुधारीत करण्याच्या प्रस्ताव विचाराधीन आहे.सुधारीत निकषांनुसार पुढील प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रवेश व परीक्षा शुल्क कमी करून शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत

(१८) ३६८५७ (१७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक (इयत्ता पाचवी) व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षा या परीक्षांचे प्रवेश शुल्क रुपये २० वरून रुपये ५० तसेच परीक्षा शुल्क रुपये ६० वरून रुपये १५० पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाचवीच्या विद्यार्थ्यांना सहावी, सातवी आणि आठवी मध्ये वार्षिक रुपये २५० ते रुपये १००० तर आठवीच्या विद्यार्थ्यांना नववी आणि दहावीत रुपये ३०० ते रुपये १५०० इतकी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरीता प्रवेश व परीक्षा शुल्क कमी करून शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. ११.११.२०२१ अन्वये सदर वाढ करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक २२.०७.२०१० अन्वये सदर वाढ करण्यात आली आहे.

(३) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरीता प्रवेश व परीक्षा शुल्क कमी करून शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर सद्यस्थितीत विचाराधीन नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग महाविद्दयालयास स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत

(१९) ३८२३७ (०१-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंजिनीअरिंगचे शिक्षण देणारे सीओईपी कॉलेज ऑफ इंजिनियरींग पुणे हे देशातील जुने आणि सर्वोत्कृष्ट महाविद्यालय सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाशी संलग्न असून सीओईपी ला सन २००३ पासून स्वायत्त दर्जा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झाले आहे हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, सीओईपी या संस्थेस स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा तसेच स्वतंत्र विद्यापीठचा दर्जा देण्याबाबत कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पुणे यांच्यावतीने राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) होय, जागतिक बँकेच्या तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रम (TEQIP) अंतर्गत दिनांक १९.०७.२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे या संस्थेस स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे.
(२) होय, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या स्वायत्त संस्थेच्या नियामक मंडळाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे संस्थेस तंत्रशास्त्र विद्यापीठाचा दर्जा प्रदान करण्यासंदर्भात ठराव संमत करून प्रस्ताव शासनास सादर केला आहे.
(३) विधीमंडळाच्या मान्यतेने तसेच मा. राज्यपाल महोदय यांच्या सहमतीने "महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२" दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नव्या शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी समिती गठित करणेबाबत

(२०) ३८२४० (०१-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील सर्व पैलूंचा अभ्यास करण्याकरिता राज्य शासनाच्या वतीने ज्येष्ठ शास्त्रज्ञ यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या जाहीर केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाच्या वतीने गठीत करण्यात आलेल्या समितीने अहवाल सादर केला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नव्या शैक्षणिक धोरण लागू करण्याबाबत सदर अहवालातील प्रमुख मुद्दे काय आहेत, तसेच सदर अहवालातील शिफारशीच्या आधारे राज्य शासन नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करणार आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२) : (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० संदर्भात अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गट समिती दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली असून सदर समितीने आपला अहवाल शासनास दि.३० जून, २०२१ रोजी सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींचे तातडीने हाती घेण्याचा कार्यक्रम, मध्यम मुदतीचा कार्यक्रम, दीर्घ मुदतीचा कार्यक्रम असे तीन भागात वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दि.२७ जानेवारी, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याकरिता प्रस्तावित करण्यात आले असून विविध विषयांवर समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील शुध्द पाण्याचे संयंत्र बसविण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२१) ३८७०७ (०९-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ८३ गावांमध्ये पाणी शुध्दीकरण संयंत्र बसविण्यासाठी ११ कोटी ७० लक्ष ३७ हजार ९०६ रुपये इतके अंदाजपत्रकीय मूल्य असल्याची निविदा प्रक्रिया काढण्यात आली असून यासाठी जीएसटीसह सुमारे १३ कोटी रुपये इतका खर्च येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कंत्राट मिळविण्यासाठी पुणे येथील एका पात्र कंपनीने नमुद केलेले ग्राहक सेवा केंद्र बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनीवर कारवाई करुन पाणी शुध्दीकरण संयंत्र बसविण्यासाठी योग्य कंपनीची निवड करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४)
सदरील कंत्राट मिळविण्यासाठी पुणे येथील एका पात्र कंपनीने बनावट ग्राहक सेवा केंद्र सुरू असल्याचे चौकशी अंती संपूर्णत: खोटे आढळून आले आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उदवभवत नाही. पाणी शुध्दीकरण संयंत्र बसविण्यासाठी पात्र कंपनीला नियमाप्रमाणे कार्यवाही करून कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून कंपनीने कामाला सुरूवात केली आहे.

शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांकडून रक्कम घेऊन नियमबाहय करार करणाऱ्या शैक्षणिक संस्था तसेच ॲप आधारीत कंपन्यावर कारवाई करणेबाबत.

(२२) ३९६९४ (०१-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यापीठाशी सामंज्यस्य करार करुन नवनवीन अभ्यासक्रम सुरु करुन विद्यापीठाच्या नावावर विद्यार्थ्यांकडून रक्कम घेऊन त्यापैकी नाममात्र रक्कम विद्यापीठाला देऊन पदवी द्यायची असे करार करणाऱ्या शैक्षणिक संस्था तसेच ॲप आधारीत कंपन्यांवर विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने कारवाई करण्याचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कंपन्या विद्यापीठाशी करार करुन त्यांच्या नावावर आम्ही शिक्षण देत आहोत असे सांगून UGC व AICTE ची परवानगी न घेता ऑनलाईन अथवा ॲप आधारीत उच्च शिक्षण देणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या वेबसाईटवर आय.आय.टी.सह अन्य नामांकित विद्यापीठाच्या विविध पदव्या उपलब्ध करुन देण्यात येऊन यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदा पदवी देणाऱ्या संबंधित एकूण किती शैक्षणिक संस्था तसेच ॲप आधारित कंपन्यांवर विरुध्द शासनाने कारवाई केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही अकृषी विद्यापीठाने अशा प्रकारचे शैक्षणिक करार केलेले नाही वा ॲप आधारित अभ्यासक्रम सुरु केलेला नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापिठांच्या समस्यांबाबत

(२३) ३९६९८ (०१-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित विद्यापिठांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने उच्च शिक्षण विभागाचे डॉ.धनराज माने यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या तज्ञांच्या समितीने राज्य शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालात सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांच्या शिफारशींचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१४-०६-२०२२) :(१) हे खरे नाही, राज्यात स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या अडचणी सोडविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल शासनास अप्राप्त आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील आदर्श शाळांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२४) ३९७०३ (०१-०४-२०२२). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५०० शाळा या आदर्श शाळा विकसीत करण्याबाबत २०२०-२०२१ च्या अधिवेशनात मा.उपमुख्यमंत्री यांनी जाहीर केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्यातील ५०० शाळांपैकी अहमदनगर जिल्हयात १६ शाळांचा समावेश होता, परंतू या शाळांना अद्यापपर्यंत कोणताही निधी शासनाकडून प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांच्या विकासासाठी निधी उपलबध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२०-०६-२०२२) : (१) होय

(२) हे खरे नाही.

दि.४फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अहमदनगर जिल्हयातील १६ आदर्श शाळांपैकी ६ शाळांना लहान बांधकामांसाठी तरतूद वितरित करण्यात आली आहे. उर्वरित शाळांच्या मोठ्या बांधकामांसाठी निधी वितरित करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) राज्यातील शाळांतील आदर्श शाळांच्या मोठ्या बांधकामासाठी रू.२५० कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२२ मध्ये मंजूर करण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठ निवृत्तीनंतरही निवासस्थाने न सोडल्याबाबत

(२५) ३९७३० (०९-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना (सांताक्रुझ) मुंबई येथील संकुलात व्याख्याते, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी विविध प्रकारची निवास व्यवस्था असून त्यामध्ये ७६ सदनिका आणि १२ बंगले आदी कुलगुरुंच्या बंगल्यासह निवासस्थानाचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवृत्तीनंतर, मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राहत असलेला बंगला/निवासस्थान काही दिवसात रिक्त करणे विद्यापीठाच्या नियमानुसार बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४ पासून निवृत्त झालेल्या अनेक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी निवृत्तीनंतरही विद्यापीठ संकुलातील शासकीय निवासस्थाने वा बंगले रिक्त केले नसल्याने तब्बल दीड कोटीहून अधिक रुपयांची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई विद्यापीठाने, व्यवस्थापन परिषद ॲड नील हेळेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्याचे व सदर समितीने अशा सर्व संबंधितांकडून मूळ थकीत रक्कमेवर दंड आकारुन वसुली करण्याबाबत अहवालाद्वारे निर्देशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे अशंत: खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) निवृत्तीनंतरही निवासस्थान रिक्त न करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून शासन नियमानुसार दंडात्मक रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून अशा कर्मचाऱ्यांकडून दंडात्मक रक्कम भरणे व निवासस्थान रिक्त न करणे यासाठी कारणे दाखल नोटीस देण्याबाबत मुंबई विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयात ट्रॅक्टरमधून होणारी ऊस वाहतूक धोकादायक झाल्याबाबत

(२६) ३९८४६ (०९-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात सध्या ट्रॅक्टरमधून होणारी ऊस वाहतूक अत्यंत धोकादायक असून ट्रॅक्टर बंद पडणे, रेफलेक्टर न बसविणे त्यामुळे रहदारीस अडथळा व अपघाताचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) : (१) नाही.

(२) अशा प्रकारच्या वाहतूकीस आळा घालण्यासाठी सांगली प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत अंमलबजावणी तसेच प्रबोधनाच्या माध्यमातून जनजागृती सातत्याने केली जाते. तसेच सर्व साखर कारखान्यांनी याविषयी काळजी घेण्याबाबत आयुक्त (साखर) यांना दि. २४.११.२०२१ चे पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील केशरी शिधा पत्रिका धारक धान्यापासून वंचीत असल्याबाबत

(२७) ४००९७ (०९-०४-२०२२). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात अंत्योदय व अन्नसुरक्षा योजना अंतर्गत शिधा पत्रिका धारकांना धान्य देण्यात येते, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, जिल्ह्यात अंत्योदय शिधा पत्रिका धारक ६०,६९७ असून या लाभार्थ्यांची संख्या २,८१,१०८ आहे, अन्नसुरक्षा शिधा पत्रिका धारक ४,६०,००८ असून या लाभार्थ्यांची संख्या ६,६२,५६४ आहे तसेच केशरी शिधा पत्रिका धारक ३,६३,३४७ असून या लाभार्थ्यांची संख्या १४,८७,१४३ आहे यापैकी केशरी शिधा पत्रिका धारक ३ लाख ६३ हजार ३४७ असून यावरील १४ लाख ८७ हजार १४३ लाभार्थ्यांना धान्यच मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन कार्ड धारकांच्या संख्येत वाढ होत असून त्यांना केशरी कार्ड देण्यात येत असल्यामुळे त्याचा फक्त निवासी पुराव्यासाठीच उपयोग होत आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केशरी कार्डधारकांना धान्य देणेकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०७-०६-२०२२) : (१) व (२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना पात्र लाभार्थ्यांना ३५ किलो प्रतिमाह प्रतिशिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब लाभार्थी यांना दरमहा प्रति लाभार्थी ५ किलो अन्नधान्य वाटप करण्यात येते.

सोलापूर जिल्हयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, २०१३ अंतर्गत ६०,५४७ शिधापत्रिकाधारकांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यात येत असून २१,९६,२५४ प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. कोरोना महामारीच्या कालावधीत माहे मे व जून, २०२० मध्ये सोलापूर जिल्हयातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंत समाविष्ट न झालेल्या १६,३६,३७३ APL (केशरी) लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात धान्य वाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिधियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादेत ग्रामीण भागाकरीता ४४,०००/- वार्षिक उत्पन्न असलेल्या व शहरी भागात ५९,०००/- वार्षिक उत्पन्न असलेल्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. या उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या APL (केशरी) कार्डधारकांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येत नसून तशी बाब शासनाच्या विचाराधिन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातंर्गत नळ पाणीपुरवठा योजनेची
कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत

(२८) ४०५१६ (०९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातंर्गत नळ पाणीपुरवठा योजनेची कामे अत्यंत संथ गतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमातंर्गत कोकणात सुरु असलेल्या नळ पाणी पुरवठयाच्या ४०० योजनांपैकी २४९ कामे पूर्ण झाली असून १५१ कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागात जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा व जीवन प्राधिकरणाच्यावतीने करण्यात येणाऱ्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (१३-०६-२०२२) : (१)अंशत: खरे आहे, सन २०२० ते २०२२ मध्ये Covid - १९ या साथीच्या रोगामुळे, नळ पाणी पुरवठा योजनांसाठी वेळेवर पुरेसे मटेरिअल व मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने, कामे संथ गतीने सुरू होती.

(२) राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यांचे मार्फत कोकण प्रादेशिक विभागात एकूण ४०० योजना असुन, त्यापैकी २४९ योजना या ३१ मार्च, २०२० पर्यंत भौतिकदृष्टया पुर्ण झालेल्या आहेत. उर्वरीत १५१ योजना ह्या केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या वाढीव मुदतीत दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत सदरच्या योजना ज्या आहेत त्या स्थितीत अंतिम करुन जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनानुसार सदरची कामे ही सुधाराणात्मक कामे म्हणून प्रस्तावित करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(३) राज्यात सन २०२१-२२ अंतर्गत जल जीवन मिशन कार्यक्रमामध्ये राज्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जि.प. मार्फत एकूण ३६,२७२ योजनांची कामे करणे प्रस्तावित असुन, त्यापैकी दि.१८ मे, २०२२ च्या स्थितीस अनुसरुन १७,७३६ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. ९४७० योजनांना कार्यादेश देण्यात आले असुन उर्वरित योजना प्रगतीपथावर आहेत. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत म.जी. प्रा. मार्फत एकूण ३५६ योजनांची कामे प्रस्तावित असुन त्यापैकी २७९ योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. ३७ योजनांना कार्यादेश देण्यात आले असुन, सदर योजना सध्या प्रगतीपथावर आहेत.
(४) तात्काळ कामे पुर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर प्रादेशीक विभाग निहाय आढावा घेऊन कामे विहीत कालावधीत पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात आले असुन तशा सुचना क्षेत्रीय कार्यालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) लागू नाही.

नांदेड जिल्हातील कोरोनाकाळात पर्यटन स्थळे बंद असल्याबाबत

(२९) ४०६४१ (०९-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील पर्यटनस्थळे कोरोनाकाळात मागील दोन वर्षापासून बंद असून यावर अवलंबून असणारे उद्योग व व्यापाऱ्यांचे उदयोग बंद असल्याने त्यांचा रोजगार बुडून ते आर्थिक अडचणीत सापडले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदशर्नास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळ सुरु करुन व्यापारी व उदयोगधंदे यांना चालना देऊन रोजगार उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२१-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) कोव्हिड १९ या साथ रोग आजाराशी संबंधित शासन आदेशानुसार नांदेड जिल्हयातील पर्यटनस्थळे सुरु करण्यात आली असून उदयोग/ व्यापार पुर्ववत सुरु झाले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर येथील अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(३०) ४०८१७ (०१-०४-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राध्यापक संवर्गातील पदे भरण्यास वित्त विभागाने मान्यता दिल्यानंतरदेखील कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर येथील अनेक पदे दीर्घ काळापासून रिक्त असून या विद्यापीठाचा कार्यभार हंगामी प्रभारी कुलगुरुंच्या नियुक्तीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या विद्यापीठाच्या रत्नागिरी येथील उपकेंद्राचे मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान उद्घाटन होऊन तेथील केंद्रदेखील पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नाही, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, सदर विद्यापीठातील प्रलंबित असलेली पदे भरण्यासंदर्भात तसेच विद्यापीठाचा कार्यभार नियमित व कायमस्वरुपी कुलगुरुंच्या मार्फत चालविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) (२) व (३)

विद्यापीठात बहुतांश शिक्षकीय पदे भरलेली असून कुलगुरू पद भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठांतर्गत रत्नागिरी येथे विद्यापीठ स्वनिधीतून उपकेंद्र स्थापन करण्यास शासन पत्र दि.१५.०३.२०२१ अन्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पर्यटन विकासातून रोजगार निर्मिती आणि रोजगार उपलब्ध करण्याबाबत

(३१) ४०९९० (०९-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जंगले, पुरातन गडकिल्ले, गुंफा, मंदिरे, समुद्रकिनारे, वन्यजीव असे पर्यटन वैविध्य असून ते जगभरात पोहचवण्यासाठी शासनाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातून देशातील व जगभरातील पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित होऊन त्याद्वारे राज्याचा पर्यटन विकास, रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल हे खरे आहे काय, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती घेऊन तेथे पर्यटकांना आवश्यक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. आदित्य ठाकरे (२१-०६-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) राज्यातील पयर्टन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी मूलभूत व इतर विविध सोयी- सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत राज्यातील पर्यटनस्थळांच्या ठिकाणी विविध मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या मागील ५ वर्षांमध्ये रु.१३८५.९५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तरुणांना वाहन चालक परवाने सवलतीच्या दराने उपलब्ध करणेबाबत

(३२) ४१२३५ (०९-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाहन चालक परवाना काढण्याची पद्धत सुलभ व्हावी यासाठी माहे जून, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान सारथी ४.० ही अद्ययावत प्रणाली सुरू करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नव्या प्रणाली अंतर्गत देण्यात आलेल्या वाहन चालक परवान्यांची संख्या किती आहे आणि नवी प्रणाली अस्तित्वात आल्यानंतर वाहन चालक परवान्यामध्ये झालेली वाढ यांचा तपशील देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, वाहन चालक परवाना उपलब्ध करण्यासाठी विशेष मोहीम राबवून तरुणांना सवलतीच्या दरामध्ये परवाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) दि. १४.०६.२०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने शिकाऊ अनुज्ञप्ती देण्याची कार्यपध्दती सुरु करण्यात आली आहे. या नव्या प्रणाली अंतर्गत दि. १४.०६.२०२१ ते ३१.०३.२०२२ या कालावधीत ९,५७,७०५ इतक्या शिकाऊ अनुज्ञप्ती घर बसल्या देण्यात आल्या.

तसेच सदर कालावधीत एकूण १८,५४,२०९ इतक्या शिकाऊ अनुज्ञप्ती प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित असलेल्या उमेदवारांना देण्यात आल्या.
(३) या नवीन सुविधेची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबत

(३३) ४१३६९ (०९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी महाविद्यालयांनी कार्यवाही केली नसल्याने इयत्ता अकरावी वी पासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या राज्यभरातील ३१ हजार ९७१ शिष्यवृत्ती प्रकरणे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर,२०२१ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (३१-०५-२०२२) : (१) व (२) अशंत: खरे आहे.

शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरीता महाडीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांकडून प्राप्त अर्जापैकी प्रथम हप्त्याचे एकूण १६०३ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज, दुसऱ्या हप्त्याचे ५,२४९ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज व सन २०२१-२२ मधील प्रथम हप्त्याचे एकुण १६,९३७ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.

सन २०२०-२१ मधील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असेलेल्या अर्जापैकी बहुतेक शिष्यवृत्ती अर्ज हे विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यामुळे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. याकरीता विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी आवश्यक उत्पन्न दाखला, रहिवास दाखला, आदी कागदपत्रांची पूर्तता करण्याकरीता सद्यस्थितीत सन २०२०-२१ व सन २०२१-२२ करीता शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची मुदत दिनांक ३१/५/२०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यानुसार प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जवार महाविद्यालय स्तरावर पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्याबाबत तसेच विद्यार्थी, महाविद्यालय यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी विभागीय सहसंचालक कार्यालय स्तरावर नोडल अधिकारी नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद चंद्रपूर येथील सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरिता वेतन व वेतनेत्तर खर्चाकरिता अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

(३४) ४१४२५ (०९-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद चंद्रपूर येथील सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरिता वेतन व वेतनेत्तर

खर्चाकरिता अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छयता ता विभाग यांना दिनांक ३० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (०६-०६-२०२२) :(१) होय.
(२) व (३) होय. याबाबत लोकप्रतिनिधींना दिनांक १०.२.२०२२ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांच्या वेतनभत्ते व प्रवासखर्च यासाठी २२१५१८४३ या लेखाशीर्षांतर्गत आणि वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांच्या वेतनभत्ते व वेतनेतर खर्चासाठी २२१५१८८१ या लेखाशीर्षांतर्गत अनुदान दिले जाते. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठी चंद्रपूर जिल्हा परिषदेला २२१५१८८१ व २२१५१८४३ या लेखाशिर्षांतर्गत वितरीत केलेला निधी, जिल्हा परिषदेने खर्च केलेला व प्रत्यार्पित केलेला निधी याबाबतचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे:-

रक्कम रु.लाखात

अ.क्र.	उप लेखाशिर्ष	जिल्हा परिषदेला वितरित निधी	जिल्हा परिषदेने खर्च केलेला निधी	जिल्हा परिषदेने प्रत्यार्पित केलेला निधी
१	२२१५१८८१ ३६, सहायक अनुदाने (वेतन)	५५१.८३००	५१५.३८७४	३६.४४२६
२	२२१५१८८१ ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	१५.००००	१५.००००	०
३	२२१५१८४३, ०१- वेतन	१२३.३२००	११२.३३४३	१०.९८५७
४	२२१५१८४३, ११, देशांतर्गत प्रवास खर्च	०.७०००	०.०७१९	०.६२८१

वेतन व भत्त्यांसाठी जिल्हा परिषदेची मागणी, प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रे विचारात घेऊन टप्प्या-टप्प्याने जिल्हा परिषदेस आवश्यक निधी वितरीत केला असून याबाबत विलंब झालेला नाही.

___

चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात रास्त भाव दुकानदार कमिशनपासून वंचित राहिल्याबाबत

(३५) ४१७७३ (०९-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात पीएम व सीएम योजनेतून मोफत धान्य वाटप करण्यात आले मात्र दुकानदार कमिशनपासून वंचित राहिल्याने शासकीय रास्त भाव दुकानदार संघटनेने तहसिलदारामार्फत पुरवठा अधिकारी चंद्रपूर यांना निवेदन दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ जानेवारी २०२२ पर्यंत कमिशन देण्यात यावे अन्यथा दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ पासून धान्य उचल करणार नसल्याचा इशारा रास्त भाव दुकानदार यांनी दिला आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन दुकानदारांना कमिशन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०७-०६-२०२२) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे जुलै ते सप्टेंबर, २०२१ करिता वितरीत करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या मार्जिनची रक्कम ₹ ३२,१२,३१३/- संबंधित रास्तभाव दुकानदारांना दि. २.२.२०२२ च्या आदेशान्वये व माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२१ करिता वितरीत करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या मार्जिनची रक्कम ₹ १९,३६,२७६/- संबंधित रास्तभाव दुकानदारांना दि. ११.५.२०२२ च्या आदेशान्वये अदा करण्यात आली आहे. तसेच, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत माहे मे, २०२१ मध्ये मोफत वितरीत करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या मार्जिनची रक्कम ₹ १३,१६,४०५/- संबंधित रास्तभाव दुकानदारांना दि. २६.४.२०२२ च्या आदेशान्वये अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

(३६) ४२०३५ (०९-०४-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे वित्त व लेखा आधिकारी हे पद मागील सहा महिन्यांपासुन रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाने या रिक्त पदाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-०६-२०२२) : (१) व (२) हे, खरे आहे.
(३) शासन पत्र दि.०५.०१.२०२२ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रिक्त असलेले वित्त व लेखा अधिकारी हे पद भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जावळी तालुक्यातील (जि.सातारा) काही मुला-मुलींना शाळेत जाण्याकरिता कोयना धरण पार करुन होडीतून प्रवास करावा लागत असल्याबाबत

(३७) ४२०७६ (०९-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने 'सारे शिकुया, पुढे जाऊया' अशी घोषणा केली त्याअनुषंगाने सर्व शिक्षा अभियानासारखे महत्वाचे उपक्रम राबविले असून देखील जावळी (जि.सातारा) तालुक्यातील मुला-मुलींना होडीतून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) तसेच शाळेत जाण्यासाठी सातारा जिल्हयातील काही मुना स्वत: होडी वल्हवून कोयना धरण पार करुन पुन्हा रानावनातून पायपीट करुन शाळेत जावे लागत असल्याने शासनाच्या सर्व शिक्षा अभियांनाच्या शिक्षण धोरणातील गैरप्रकार निदर्शनास आला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानेही या रजिस्ट्रारला सु-मोटो याचिका दाखल करण्याचे आदेश दिले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत मुलींना सर्व शिक्षण अभियांना अतंर्गत गावोगावी जाऊन शिक्षण मिळण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१४-०६-२०२२) : (१) व (२) खिरखंडी, ता. जावळी जि.सातारा येथील मुला-मुलींना शाळेत जाण्यासाठी कोयना धरणाच्या बॅकवॉटर मधून होडीने व त्यानंतर जंगलातून पायवाटेने प्रवास करावा लागतो.
(३) हे खरे आहे.
(४) समग्र शिक्षा अंतर्गत बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायद्यामधील तरतुदीनुसार मुलांना शाळेत जाता यावे यासाठी प्रति विद्यार्थी प्रति महिना रू.३०० /- याप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येतो. तो सन २०२२-२३ पासून प्रति विद्यार्थी प्रति महिना रू.६००/- इतका करण्यात आला आहे.
(५) विलंब झालेला नाही.

इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य या शासकीय महाविद्यालयाच्या जागेत विज्ञान शाखेकरिता स्वतंत्र इमारत उभारण्याबाबत

(३८) ४२४१६ (०९-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य या शासकीय महाविद्यालयामधील तीनही विद्या शाखांमध्ये मिळून जवळपास ४५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून पुढील शैक्षणिक वर्षापासून या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेच्या सर्व विषयांत पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन अभ्यासक्रम (पीएचडी) सुरू करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या महाविद्यालयातील ग्रंथालयाची जागा ही विद्यार्थ्यांना अपुरी पडत असून विज्ञान शाखा सुरू असलेल्या दोन्ही इमारती या धोकादायक झाल्या असून भविष्यात यामुळे जीवित हानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच पुढील शैक्षणिक वर्षापासून या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेच्या सर्व विषयांत पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व सद्य:स्थितीत येथे विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेकरिता स्वतंत्र इमारत उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचेकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये केली असून सदरहू इमारतीच्या बांधकामाचे अंदाजे ७३,९६,०२,९२६/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य) यांनी तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दिनांक २० एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयानुसार इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व) च्या आवारात मुलींकरीता ३२० प्रवेश क्षमतेचे वसतीगृह बांधण्यास मंजूरी देण्यात आली असून सदरहू वसतीगृहाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव शासनाकडे प्राप्त झाले आहे काय, सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेकरीता स्वतंत्र इमारत बांधण्याकरीता तसेच मुलींकरीता वसतीगृह बांधण्यास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०८-०६-२०२२) : (१) मुंबई विद्यापीठाने दिनांक ३१.०३.२०२२ च्या पत्रान्वये सदर महाविद्यालयामध्ये एकूण ०६ पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) सदर महाविद्यालयाची ग्रंथालयाची इमारत विद्यार्थ्यांना अपुरी पडत असून सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदर महाविद्यालयामध्ये ग्रंथालय व विज्ञान शाखेसाठी नवीन इमारत बांधकामाचे रू. ७३,९६,०२,९२६/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदरचे बांधकाम सन २०२२-२३ साठी प्रस्तावित केलेले असल्याने जिल्हा नियोजन समिती, मुंबई यांनी सन २०२२-२३ साठी मंजूर होणारी तरतूद विचारात घेऊन सदरचा प्रस्ताव सादर करणेबाबत महाविद्यालयास दिनांक १३.०१.२०२२ अन्वये कळविले आहे.

(४) व (५) सदर महाविद्यालयात मुलींचे वसतिगृह बांधकामाचे रू. ३४,७०,४३,०५९/- इतके अंदाजपत्रक व नकाशा शासनास सादर करण्यात आलेले आहे. याअनुषंगाने शासन पत्र दिनांक ०९.०३.२०२० अन्वये सचिव समितीच्या सूचनांनुसार CSR निधी, पी.पी.पी. मॉडेल किंवा भाडेतत्वाचा वापर करता येईल किंवा कसे याबाबत तपासणी करून स्वंयस्पष्ट अभिप्राय सादर करणेबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

बहादपूर शिरसोदे व महाळपूर (ता.पारोळा, जि.जळगाव) येथे नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर करणेबाबत

(३९) ४२५१२ (०९-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहादपूर शिरसोदे व महाळपूर (ता.पारोळा, जि.जळगाव) गावांतील पाणी टंचाई दूर करण्यासाठी नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याची मागणी ग्रामस्थ सन २०१४ पासून सातत्याने मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तिन्ही गावांसाठी शासनानेकडे ११ कोटी पाणी योजना मंजूर केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेसाठी शासनाने निधी देऊन तातडीने काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (०९-०६-२०२२) : (१) होय.

(२) होय.

बहादरपूर, शिरसोदे व महाळपूर ता. पारोळा या गावांसाठी रु. ११६८.३० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांनी दिनांक २८.१२.२०२१ ला तांत्रिक मान्यता दिलेली असून, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक २४.०१.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

(३) सदर योजनेची रु. ८८५.०८ लक्ष इतक्या किंमतीची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जळगांव या कार्यालयामार्फत काढण्यात आली असून, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक १९.०५.२०२२ अन्वये स्विकृत केली आहे. तसेच संबंधित ठेकेदारास इरादा पत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दर्जात वाढ करण्याबाबत

(४०) ४२६५३ (०९-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिवसेंदिवस वाढत असलेल्या वाहनांच्या संख्येमुळे प्रामुख्याने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयावरील कामांचा ताण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पिंपरी-चिंचवडसह इतर नऊ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील वाढते कामकाज व महसूल बघता उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव परिवहन आयुक्तांकडे मंजुरी अभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची प्रादेशिक परिवहन अधिकारी पदी पदोन्नती देण्याचा प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित असून पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासह राज्यातील इतर नऊ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांचा दर्जा वाढविण्याबाबत परिवहन आयुक्तांकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) : (१) वाढती वाहन संख्या व बदलते तंत्रज्ञान यामुळे मोटार वाहन विभागातील कामाच्या स्वरुपात बदल झाल्याने कामकाजात वाढ झाली आहे.
(२) व (३) राज्यातील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची प्रादेशिक परिवहन अधिकारी पदी पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर कार्यवाही खाली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील धान पिकाला योग्य भाव मिळत नसल्याबाबत

(४१) ४२६८२ (०९-०४-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा व गोंदिया जिल्ह्यामध्ये धान पिकाचे उत्पादन करणारे अनेक शेतकरी असून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात धानाची लागवड होत असते परंतु बी-बियाणे व खतांच्या भाववाढीमुळे तसेच धानाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना शेती करणे त्रासदायक झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना योग्य भाव व सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या धानाला योग्य भाव व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१७-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने धान विकावे लागू नये, याकरिता राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हमीभावाने धान खरेदी करण्यात येते.

शासन निर्णय, दि.३०/०९/२०२१ अन्वये पणन हंगाम २०२१-२२ मध्ये राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हमीभावाने धान खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये भंडारा जिल्ह्यात हमीभाव दराने १,२५,९८४ शेतकऱ्यांकडून रु.७३८.६९ कोटी इतक्या रकमेचे ३८,०७,६९७.४८ क्विंटल आणि गोंदिया जिल्ह्यात १,५३,७१७ शेतकऱ्यांकडील रु.८५५.६६ कोटी इतक्या रकमेचे ४४,१०,६५३.५४ क्विंटल धान खरेदी करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय, दि.३०/०९/२०२१ अन्वये पणन हंगाम २०२१-२२ मध्ये राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हमीभावाने धान खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात मर्जीतील संस्थांना कामे देण्यासाठी शासनाच्या वरिष्ठ अधिका-यांनी शासनाचे आदेश डावलून कोटयवधीची कामे प्रस्तावित केल्याबाबत

(४२) ४२७४२ (२३-०५-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात मर्जीतील संस्थांना कामे देण्यासाठी शासनाच्याच वरिष्ठ अधिका-यांनी शासनाचे आदेश डावलून रुपये १० रुपयेची कोटीची कामे प्रस्तावित केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपुर जिल्ह्यातील पाणी पुरवठा व जलशुध्दीकरणाची इलेक्ट्रीकल क्लोरीरेटर, फ्लोराईड रिमुव्हल सयंत्रणे लावण्यासाठीच्या कामांसाठी रुपये १० कोटीच्या निविदा स्वीकारुन निधीही मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू प्रकरणात दोषी असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गुलाबराव पाटील (१४-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद- चंद्रपूर अंतर्गत माहे डिसेंबर २०२१ मध्ये १० कोटीची कोणतीही कामे प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत.

(२) चंद्रपूर जिल्हयातील इलेक्ट्रोक्लोरीनेटर कामांना दिनांक २३.०४.२०२१ व फ्लोराईड रिमुव्हल संयंत्र लावण्याच्या कामांना दिनांक २८.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान, चंद्रपूर निधी अंर्तगत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) जिल्हा परिषद- चंद्रपूर अंतर्गत इलेक्ट्रोक्लोरीनेटरची प्रथम निविदा दिनांक २८ जुलै २०२१, दुसरी निविदा दिनांक ०१ ऑक्टोबर २०२१ व तिसरी निविदा दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ तर फ्लोराईड रिमुव्हल संयंत्राबाबतची निविदा दिनांक २८.०९.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. इलेक्ट्रोक्लोरीनेटर, निविदेत स्पर्धा न झाल्याने फेरनिविदा काढण्यात आली. फेर निविदेत पात्र ठरलेल्या ३ निविदा धारकांपैकी सर्वात कमी दराने भरलेली निविदा स्वीकारण्यात आली व संबंधित कंत्राटदारास दि.०३.०१.२०२१ ला कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयाचे आरटीओ कार्यालय वाहतुक नियंत्रण विभागाच्या जागेत सुरु करणेबाबत

(४३) ४३५१८ (०९-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयाचे आरटीओ कार्यालय वाहतुक नियंत्रण विभागाच्या जागेत सुरु करा, मोटार वाहन कायदा अंतर्गत मालवाहतूक भाडयाची व्याख्या करण्यात यावी, नवीन वाहतूकीचे दंड कमी करावा इत्यादी मागण्या सांगली जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशने माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान राज्य परिवहन आयुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रश्न भाग १ मधील मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (०८-०६-२०२२) : (१) होय.
(२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांचे सध्याचे कार्यालय महानगरपालिकेच्या भाडयाच्या जागेत कार्यरत आहे. जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून वापरात नसलेली एक निवासी इमारत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने मोटार वाहन कायद्यात सुधारणा केल्यानंतर राज्य शासनाने दि. ०१.१२.२०२१ पासून तडजोड शुल्काच्या रकमेत वाढ केलेली आहे.

सद्य:स्थितीत बाजारातील प्रचलित दरानुसार मालवाहतूक वाहनांचे भाडेदर आकारली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मागाठाणे विधानसभा मतदार क्षेत्रातील ग परिमंडळ अंतर्गत येणा-या शिधावाटप दुकानदारांकडे नागरिकांना होणा-या त्रास तसेच योग्य धान्य वाटप होत नसल्याबाबत

(४४) ४३६२४ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर मधील मागाठाणे येथील ग परिमंडळ अंतर्गत येणा-या शिधावाटप दुकानदारांकडे नागरिकांना होणा-या त्रासाबद्दल तसेच योग्य धान्य वाटप होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार केल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे याबाबत तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०६-०६-२०२२) : (१) मागठाणे क्षेत्रामध्ये शिधावाटप कार्यालय क्र.४७ ग, दहिसर व ४३ ग, बोरीवली या कार्यालयांचा समावेश होत असून मागाठाणे विधानसभा मतदार क्षेत्रातील नागरिकांना दुकानदारांकडून होणाऱ्या त्रासाबद्दल तसेच योग्य धान्य वाटप होत नसल्याच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयांकडे तसेच उपनियंत्रक शिधावाटप, ग-परिमंडळ यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर पर्यटन क्षेत्राचा विकास करण्याबाबत

(४५) ४३६७५ (०९-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर परिसराचा विकास न झाल्याने येथे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यटन क्षेत्राचा विकास करणेबाबत शासन विचाराधीन असून यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा. पर्यटन मंत्री महोदय यांना दिलेले निवेदन शासनाला प्राप्त झाले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने टिटवाळा येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर परिसराचा पर्यटन क्षेत्राच्या दृष्टीने विकास होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. आदित्य ठाकरे (२१-०६-२०२२) : (१) नाही.

(२) मा. स्थानिक लोकप्रतिनिधींची दि.१४.०२.२०२२ व दि.२८.०२.२०२२ ची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) उपरोक्त नमूद दोन्ही निवेदनांवर संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

तथापि, यापूर्वीच प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०१७-१८ अंतर्गत टिटवाळा मंदिर परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रस्ता व गटार, विद्युतीकरण, सुशोभिकरण, मंदिर चौक व कमान, वाहनतळ इ. रु.२४९.२२ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन सदर कामांसाठी आतापर्यंत रु.२२५.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, ठाणे यांना वितरीत करण्यात आला आहे.

तसेच सन २०१२-१३ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत टिटवाळा येथे नवीन पर्यटक निवास उभारण्यासाठी रु.३००.०० लक्ष निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(४६) ४३८३४ (०९-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय क्र.ग्रा.पा.भो-१९०९/पा.पु.०७ दि.९ सप्टेंबर, २००९ नुसार जि.प.अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये कंत्राटी कनिष्ठ अभियंता या पदावर स्पर्धात्मक मुलाखतीव्दारे गुणांनुक्रमानुसार भरती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने भरती करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याकरीता विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे, त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (०९-०६-२०२२) : (१) होय,

(२) शासनाच्या दि. ०९ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तांत्रिक सेवा पुरवठादाराऐवजी जिल्हा परिषद स्तरावर जिल्हयातील कामाच्या प्रमाणात करार पध्दतीने कंत्राटी कनिष्ठ अभियंताच्या सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली होती.

वरील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अभियंत्यांची निवडसूची तयार करुन त्यांच्या गुणानुक्रमांनुसार कंत्राटी पध्दतीने जिल्हा परिषदेमार्फत नियुक्ती देणे व संबंधिताकडुन विहीत करारनामा करुन घेण्याच्या सूचना सदर शासन निर्णयात अंतर्भूत होत्या हे खरे आहे.

(३) दि. ४ सप्टेंबर, २०२० पासून राज्यात केंद्र पुरस्कृत जल जीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनानुसार केंद्र शासनाने सूचविलेल्या मनुष्यबळाव्यतीरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ संस्थेस बाहय संस्थेव्दारे उपलब्ध करुन घेण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या दि. १० फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना जल जीवन मिशनकरिता अन्य मनुष्यबळ हे केवळ बाहययंत्रणेव्दारे (Outsourcing) तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या वरील पत्राने व्यथित होऊन मा. उच्च न्यायालयात काही कंत्राटी कनिष्ट अभियंत्यांनी याचिका दाखल करुन शासनाचा दि. ४ सप्टेंबर, २०२० निर्णय व दि. १० फेब्रुवारी, २०२१ चे पत्र रद्द करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती केली आहे. मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी अंतरिम आदेशाव्दारे “जैसे थे” असे आदेश पारित केले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर व इतर जिल्हयात आधार सीडिंग नाझालेल्या शिधापत्रिका बाबत.

(४७) ४३८७५ (०९-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर व इतर जिल्हयात किती आधार सीडिंग नसलेल्या शिधापत्रिका व सदस्य आहेत तसेच सदर आधार सीडिंग न झालेले सदस्य प्रत्यक्षात आहेत काय,

(२) असल्यास, आधार सीडिंग होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजन केल्या, असल्यास, शिधापत्रिका व त्यावरील सदस्य यांची आधार सीडिंग न होण्याची करणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आधार सीडिंग न झालेल्या सदस्यांची आधार सीडिंग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच त्यांचे आधार सीडिंग किती दिवसात पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (१६-०६-२०२२) : (१) राज्यात माहे एप्रिल, २०२२ अखेर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत १,५४,०२,५२६ पात्र शिधापत्रिकांपैकी १,५३,७७,०८२ एवढ्या शिधापत्रिकांचे व ६,८३,६७,५५१ एवढ्या लाभार्थ्यांपैकी ६,२६,७६,७२७ एवढ्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करण्यात आले आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयामध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत ४,०४,७१४ पात्र शिधापत्रिकांपैकी ४,०४,५७७ एवढ्या शिधापत्रिकांचे व १५,६१,३८७ लाभार्थ्यांपैकी १५,१५,७५८ एवढ्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करण्यात आले आहे.

(२) ज्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग झालेले नाही त्यांचे धान्याचे मासिक वाटप करतेवेळी ई-पॉस उपकरणांवर ई-केवायसी प्रणालीद्वारे रास्तभाव दुकानदार यांच्यामार्फत शिधापत्रिकेतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शिधापत्रिकाधारक यांनी आधार कार्ड उपलब्ध करुन न देणे, आधारकार्ड अदयावत नसणे, लाभार्थी स्थलांतरीत झाल्याने, रोजगारानिमित्त इतरत्र जाणे, लग्न करुन बाहेर जाणे इ. कारणांमुळे लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका आधार सिडींग करण्यास विलंब होत आहे.

(३) रास्तभाव दुकानदार यांचेमार्फत ई-केवायसी सुविधेद्वारे आधार सिडींग करण्यात येत आहे. आधार कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत. तसेच आधार सिडींग करण्यासाठी आधार कार्डची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकंडून जनजागृती मोहिम राबवून आधार सिडींग करण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत लाभ घेत असलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका आधार सिडींग पूर्ण करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील नविन इस्टांक वाढविण्याबाबत

(४८) ४३८८१ (०९-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा हा अतिदुर्गम व आदिवासी बहुल जिल्हा असून सदर जिल्हयात नविन शिधापत्रिका धारकांना धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयात नविन इस्टांक मंजुरीची कार्यवाही सुरु केली आहे काय व त्यानुसार किती इस्टांक मंजुर झाला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. छगन भुजबळ (०६-०६-२०२२) : (१) व (२) होय हे खरे आहे. चंद्रपूर जिल्हयांमध्ये अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या, परंतु शासनाकडून चंद्रपूर जिल्हयासाठी अंत्योदय अन्न योजनेकरीता ५०६३ शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब योजनेकरीता १,११,७९८ लाभार्थी इष्टांक वाढवून देण्यात आला आहे. सद्यस्थितीत चंद्रपूर जिल्हास १,४०,६२१ अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका व १०,७४,२४० प्राधान्य कुटुंब लाभार्थी असा सुधारित इष्टांक देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने विविध मागण्याच्या पूर्ततेसाठी संप पुकारल्याबाबत

(४९) ४३९०५ (०९-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी, निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने विविध मागण्याच्या पूर्ततेसाठी दिनांक २३ व २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या दरम्यान राज्यव्यापी लाक्षणिक संप पुकारला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (२१-०६-२०२२) : (१) (२) व (३)

दिनांक २३.०३.२०२२ रोजी दुपारी मा.विधानपरिषद सदस्यांसोबत मा.मंत्री, शालेय शिक्षण यांची बैठक झाली.बैठकीत शालेय शिक्षण विभागातील विविध प्रलंबित विषयांबाबत सखोल चर्चा झाली. बैठकीतील निर्णयांनुसार कार्यवाही सुरु आहे.

औरंगाबाद जिल्हयातील ७४ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(५०) ४४०७८ (०९-०४-२०२२). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील गावांमध्ये जिल्हा परिषदेच्यावतीने सार्वजनिक पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असल्या तरी औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील ७४ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (०९-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हयात जल जीवन मिशन संकेतस्थळावर ७४ पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर होत्या. त्यातील ७१ योजना जिल्हा परिषदेमार्फत व ३ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात आल्या आहेत.

७४ योजनांमधून पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. २५ योजना भौतिक व आर्थिकदृष्ट्या अंतिम करण्यात आल्या आहेत. १९ योजना १००% पूर्ण झाल्या असून सदर योजनांची अंतिम देयके पारित करून योजना आर्थिकदृष्ट्या अंतिम करण्यात येत आहे. ८ योजना न्यायालयीन प्रकरणांमुळे प्रलंबित आहेत. २२ योजना जल जीवन मिशन धोरणानुसार ४० एलपीसीडी ऐवजी ५५ एलपीसीडी नुसार पाणी पुरवठा करावयाचा असल्याने पाण्याची टाकी/ पाईपलाईन/पंप यात बदल होणार आहे. तेव्हा अपुर्ण असलेल्या योजना “आहेतशा” अंतिम करून उर्वरीत सर्व कामे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत प्रस्तावीत आहे.

(२) जिल्हा परिषद स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.